FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station पा.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No. 03, वर्ष Year २०२४, दिनांक Date १६/०१/२४

2. (i) अधिनियम Act म.प्र.अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day बुधवार, तारीख पासून Date from १५/०१/२४ वेळ Time गुरुवार, तारीख पर्यंत Date to १६/०१/२४, वेळ Time १६.१५ वा

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date १५/०१/२४, वेळ Time १३.०० वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४६, तारीख Date १६/०१/२४, वेळ Time २३.४० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ......, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ......

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name कामा हॉस्पिटलच्या गेट जवळील, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward फुटपाथवर, रस्त्याचे नाव Name of road ......

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name अजय बिभिषण कुरे (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name बिभिषण कुरे

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३१ वर्ष (d) राष्टीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९०६९६९१२१२

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ...... दिल्याचा दिनांक Date of Issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation ......

   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste बंजारी, जनजात Sub-Caste ......

   (h) पत्ता : Address : ...... गल्ली / सर्वे नं. Ward ...... घर / नाव नंबर House/Name No. ...... फोन / मो. नंबर Phone/M. No. आधार कार्ड न ९३००६८४३३६८६ पॅन नं. Pan No. ...... वोटर्स नं. Card No. ......

   रस्त्याचे नाव Road ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......

   तालुका Taluka ...... जिल्हा Distt. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   १) सुरेश बनसीजी पाटील, पद प्रबंधक
   २) विशाल विष्णु चव्हाण, पद लिपीक
   ३) अमित प्रकाश महांगडे, पद लिपीक

   } कार्यालय: महाराष्ट्र पॅरामेडीकल कौसिल, कामा हॉस्पिटल, मुंबई.

फिर्यादी यांनी फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखित केली
असून तिलाच प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत

समक्ष

Supriya
सुप्रिया गावडे
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि मुंबई

दिनांक १६/०१/२०२५

**फिर्याद**

अजय बिभिषण कुटे वय- ३१ वर्षे, धंदा :-नोकरी (क्ष-किरण वैद्यनिक अधिकारी) रा. ठी. - मु.पो.सोनगीरी, तालुका-भुम, जिल्हा-धाराशिव, मोबाईल नं.-९०६९६९१२१२ आधारकार्ड क्र. ९३०० ६८४३ ३६८६

------------

मी वरीलप्रमाणे असून नमूद पत्त्यावर माझ्या जन्मापासून माझे आई वडिलानासोबत राहवयास आहे. मी साधारण जानेवारी २०२४ मध्ये आरोग्य विभागाची सरळसेवा परिक्षा दिली व सदर परिक्षेमध्ये उत्तीर्ण होवून दिनांक १३/०७/२०२४ रोजी माझी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी म्हणून आष्टा येथील ग्रामीण रूग्णालय, आष्टा, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली येथे उपसंचानलाय, आरोग्य सेवा कोल्हापुर विभाग यांच्याकडून माझी नेमणूक करण्यात आली.

मी दिनांक २७/०७/२०२४ रोजी महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई यांच्या नावे नोंदणी करण्याकरीता www.maharashtraparamedicalcouncil.org या वेबसाईडवरून ऑनलाईन अर्ज केला होता. सदरची नोंदणी मी करीत असलेल्या सरकारी नोकरी करीता बंधनकारक असल्याने मी सदरचा अर्ज केला होता. दिनांक ०८/०१/२०२५ रोजी मी ऑनलाईन केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने माझ्या ajaykute5005@gmail.com या खाजगी ई-मेल वर सदर कार्यालयाचा मेल आला. सदर ई-मेलच्या अनुषंगाने मी दिनांक १३/०१/२०२५ रोजी माझे सर्व मुळ कागदपत्र नियमाप्रमाणे घेवून महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई कामा रूग्णालया याठिकाणी असलेल्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत गेलो. सदर कार्यालयात गेल्यावर माझी लोकसेवक विशाल चव्हाण,लिपीक यांच्याशी ओळख झाली. व त्यांना मी माझ्या महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, च्या नोंदणी प्रमाणपत्र लवकर देण्याकरीता विनंती केली. परंतु त्यांच्याकडून असे सांगण्यात आले की, सदरच्या नोंदणी करीता दोन ते अडीच महिन्याचा कालावधी लागतो. जर सदरची नोंदणी लवकर पाहिजे असल्यास या परिषदेचे निबंधक श्री.सुरेश पाटील यांना भेटा. त्यानंतर मी तात्काळ लोकसेवक सुरेश पाटील यांना भेटलो. त्यावेळी लोकसेवक सुरेश पाटील यांनी माझ्याकडे रू. ५०,०००/- (पन्नास हजार फक्त) लाचेच्या रक्कमेची मागणी केली आणि नंतर लोकसेवक विशाल चव्हाण यांच्याशी लाचेची रक्कम कमी करण्यासाठी बोलणी करण्यास सांगितले. लोकसेवक विशाल चव्हाण यांच्याशी माझे लाचेची रक्कम कमी करण्यासंदर्भात चर्चा झाली व त्यांनी लोकसेवक सुरेश पाटील यांच्या सांगण्यावरून लाचेची रक्कम ५०,०००/-(पन्नास हजार फक्त) वरून कमी करून ४०,०००/-(चाळीस हजार फक्त) हजार इतकी केली. व लोकसेवक विशाल चव्हाण यांनी दिनांक १४/०१/२०२५ रोजी लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितली. मला लोकसेवक सुरेश पाटील व विशाल चव्हाण यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १५/०१/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लोकसेवक श्री.सुरेश पाटील व विशाल चव्हाण यांचेविरुध्द समक्ष लेखी तक्रार केली.

माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाप्रवि, मुंबई विभागाचे पोलीस निरीक्षक सुप्रिया गावडे व पोलीस निरीक्षक संतोष गुजर यांची नेमणुक करण्यात आली. त्यानंतर मी केलेला लेखी तक्रार अर्जावर मी स्वाक्षरी केली व सदरचा तक्रार अर्ज पोलीस निरीक्षक गावडे यांचेकडे दिला.

त्यानंतर पोनि सुप्रिया गावडे यांनी मला माझे तक्रारीची पडताळणी दोन शासकीय पंचासमक्ष करण्यात येणार असल्याचे सांगून त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली व समजावून सांगितले. त्यानुसार आम्ही सर्व शासकीय वाहनाने फिरोजशहा गोदरेज स्काउट आणि गाईड पॅविलियनच्या गेटजवळ सी.एस.एम.टी. या ठिकाणी आलो. त्यानंतर पो.नि. गावडे यांनी मला व माझेसोबत पडताळणी कारवाईकरीता येणारे पंच श्री. वाघमारे यांना पडताळणी दरम्यान करावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. गावडे यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून सुरू करून पो.ह. गायकवाड यांनी सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच वाघमारे टॅक्सीने लोकसेवकाच्या कामा हॉस्पीटलच्या परिसरात गेलो. व तेथून मी लोकसेवक विशाल चव्हाण यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९९३०६८८१९० वर माझा मोबाईल क्रमांक ९०६९६९१२१२ वरून फोन केला व सदरवेळी माझ्यात व लोकसेवक विशाल चव्हाण यांच्यासोबत मोबाईल फोनवर मी केलेल्या ऑनलाईन अर्जाबाबत बोलणे झाले. मी सदर ठिकाणी काहीवेळ उभा राहिलो, काहीवेळाने लोकसेवक विशाल चव्हाण व एक इसम हे साधारण १५ ते २० मिनिटांनी मी उभे असलेल्या ठिकाणी आले. लोकसेवक विशाल चव्हाण यांनी त्यांच्या सोबत आलेले इसम यांचे नाव लोकसेवक अमित प्रकाश महांगडे,लिपीक अशी करून दिली. व पुन्हा माझ्या व त्यांच्यात कामासंदर्भात चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक विशाल चव्हाण यांनी मला दिनांक १६/०१/२०२५ रोजी लाचेची रक्कम रू. ४०,०००/- (चाळीस हजार फक्त) मागणी करून घेवून येण्यास प्रत्यक्ष सांगितले. त्यानंतर मी व पंच सदर ठिकाणाहून निघुन शासकिय वाहन उभे असलेल्या ठिकाणी पायी चालत आलो. व शासकिय वाहनात बसलो. त्यानंतर पो.नि.गावडे यांनी मला व पंच वाघमारे यांना सदर ठिकाणी काय घडले असे विचारणा केली असता मी त्यांना सांगितले की, लोकसेवक विशाल चव्हाण यांनी मला दिनांक १६/०१/२०२५ रोजी लाचेची रक्कम ४०,०००/-(चाळीस हजार फक्त) मागणी करून घेवून येण्यास प्रत्यक्ष सांगितले. व सदरचे संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार दि. १६/०१/२०२५ रोजी मी दुपारी ला.प्र.वि मुंबई कार्यालयास हजर झालो. त्यानंतर पोनि गावडे, पोनि. गुजर, पंच, सापळा पथक असे शासकिय वाहनाने लाप्रवि कार्यालयातुन निघुन फिरोजशहा गोदरेज स्काउट आणि गाईड पॅविलियनच्या गेटजवळ सी.एस.एम.टी. या ठिकाणी आलो. त्यांनतर पोनि गावडे यांनी सापळापुर्व कारवाईचे आयोजन करून मला, पंच वाघमारे, मगरे व सापळा पथकास सापळा कारवाईकरीताच्या सुचना देवून त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून तो सुरू करून पो.ह. गायकवाड यानी माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. वाघमारे असे लोकसेवक विशाल चव्हाण यांना भेटण्याकरीता कामा हॉस्पीटलच्या दिशेने टॅक्सीने गेले व उर्वरित सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार हे पायी चालत गेले. व कामा हॉस्पीटलच्या आतील बाजूस असलेल्या परिसरात कोणलाही संशय येणार नाही अशापध्दतीने उभे राहिलो. त्यानंतर मी व पंच वाघमारे कामा हॉस्पीटलच्या पहिल्या मजल्या गेलो. मी महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई या कार्यालयाच्या आत गेलो. व पंच वाघमारे हे कार्यालयाच्या बाहेर उभे राहिले. त्यानंतर मी व पंच वाघमारे पुन्हा कामा हॉस्पीटलच्या आवारात येवून उभे राहिलो. काहीवेळा नंतर लोकसेवक विशाल चव्हाण व लोकसेवक अमित महांगडे हे त्यांच्या कार्यालयातुन बाहेर पडून कामा हॉस्पीटलच्या आवारात आले व कामा हॉस्पीटलच्या गेट नंबर ०१च्या दिशेने चालत गेले. व लोकसेवक चव्हाण यांनी मान हालवुन मला सदर गेटच्या दिशेने चालत येण्याचा इशारा केला. त्याप्रमाणे मी त्यांच्या दिशेने चालत गेलो व पंच वाघमारे यांना त्याच ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक चव्हाण, लोकसेवक महांगडे व मी कामा हॉस्पीटल गेट नंबर ०२ बाहेरील फुटपाथवर गेलो. सदर ठिकाणी आमच्या दोन ते तीन मिनिट माझ्या कामासंदर्भात चर्चा झाली. व लोकसेवक चव्हाण यांनी मला मी आणलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली. त्यावेळी मी माझ्या निळया रंगाच्या बॅगेत पिवळया प्लास्टीकच्या पिशवीमध्ये ठेवलेली लाचेची रक्कम ४०,०००/- (अक्षरी चाळीस हजार फक्त) माझ्या डाव्या हाताने माझी निळी बॅगे पकडून उजव्या हाताने बॅगेतील पिवळया प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये ठेवलेली लाचेची रक्कम ही लोकसेवक चव्हाण यांना दिली असता, लोकसेवक विशाल चव्हाण यांनी मला सांगितले की, सदरची लाचेची रक्कम लोकसेवक अमित महांगडे हयाच्याकडे देण्यास सांगितले. सदरची लाचेची रक्कम रू. ४०,०००/- लोकसेवक महांगडे यांनी स्विकारून त्यांनी परिधान केलेल्या काळया रंगाच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर लोकसेवक अमित महांगडे व लोकसेवक विशाल चव्हाण हे कामा हॉस्पीटल गेट नंबर ०२ च्या दिशेने मी दिलेली लाचेची रक्कम घेवून पायी चालत निघाले व त्यांच्या मागोमाग मी देखील पायी चालत निघालो. लोकसेवक चव्हाण व लोकसेवक महांगडे हे कामा हॉस्पीटलच्या गेट नंबर ०१ च्या आतील बाजूस काही अंतरावर आल्यावर व मी काम हॉस्पीटलच्या गेट नंबर ०२ येथे असताना सापळा पथकास माझ्या वापरत्या रूमालाने तोंडावरून हात फिरवून लाचेची रक्कम लोकसेवक चव्हाण यांनी स्विकारल्याबाबत पूर्वनियोजित इशारा केल्यानतर दबा धरून बसलेल्या पथकामधील अंमलदारांनी लोकसेवक विशाल चव्हाण व लोकसेवक अमित महांगडे यांना काम हॉस्पीटलच्या गेट नंबर ०२ येथे रंगेहाथ ताब्यात घेतले. त्यानंतर मी, लोकसेवक विशाल चव्हाण, लोकसेवक अमित महांगडे, पो.नि.गावडे, पो.नि.गुर्जर, सापळा पथकातील अंमलदार श्री. सणस असे कामा हॉस्पीटल गेट नंबर ०२ च्या बाजूस असलेल्या कॅबिन मध्ये गेलो. तेथे पो.नि.गुर्जर यांनी लोकसेवक चव्हाण यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९९३०६८८१९० वरून लोकसेवक सुरेश बन्सीजी पाटील (प्रबंधक) यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ८३५६८५०५४६ वर फोन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक चव्हाण यांनी लोकसेवक सुरेश बन्सीजी पाटील यांना फोन करून तक्रारदार कुटे यांनी लाचेची रक्कम रू. ४०,०००/- (अक्षरी चाळीस हजार फक्त) आणली असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, पो.नि.गुर्जर, पो.नि.गावडे, पंच, सापळा पथकातील अंमलदार असे कामा हॉस्पीटल मधील पहिल्या मजल्यावरील महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई या कार्यालयात लोकसेवक सुरेश बन्सीजी पाटील, पद-प्रवंधक यांच्या कार्यालयात गेलो व त्यांना अटकेची कारणे सांगुन ते बसलेल्या ठिकाणी त्यांना अटकाव करण्यात आले.

तरी लोकसेवक सुरेश बन्सीजी पाटील, ६० वर्षे, धंदा-नोकरी (पद-प्रबंधक, महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई ) व लोकसेवक विशाल विष्णू चव्हाण, ३५ वर्षे, धंदा- नोकरी, (लिपीक, महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई ), लोकसेवक अमित प्रकाश महांगडे (लिपीक, महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई ) यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वतःच्या गैरफायदयाकरीता मी करत असलेल्या शासकीय नोकरी करीता लागणारी महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद, मुंबई ची नोंदणी करीता दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझेकडे रू. ४०,०००/- रकमेची मागणी करून केली. दि. १६/०१/२०२५ रोजी लोकसेवक अमित प्रकाश महांगडे यांनी माझेकडून रू. ४०,०००/- स्विकारताना त्यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून माझी हया तीनजणा विरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझा हा जवाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केलेला असून तो मी वाचुन पाहिला, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर असुन खरा आहे.

समक्ष,
Supriya
(सुप्रिया गावडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

श्री. अजय बिभी

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नारिया लेकी व ठिकाणी यातील फिर्यादी हे सध्या वैमानिक अधिकारी म्हणून ग्रामीण रुग्णालय, आष्टा सांगली येथे असून नियुक्तीनंतर त्यांना महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलची नोंदणी करणे बंधनकारक होते. म्हणून सदर कार्यालय येथे अर्ज केला होता दि.१३/०७/२५ रोजी फिर्यादी प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता सदर कार्यालयात गेले असता लोकसेवक क्र.१ यांनी प्रमाणपत्र देण्याकरिता फिर्यादीकडे ४००००/- रुपयांची लाचेची मागणी फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.१५/०७/२५ रोजी लाप्रवि कार्यालय येथे लेखी तक्रार दिल्याने पडताळणी कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान लोकसेवक क्र.२ यांनी लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल केले दि.१६/०७/२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक ३ यांनी लोकसेवक २ यांच्या सांगण्यावरून रु ४००००/- ची रक्कम स्विकारली. त्यानंतर लोकसेवक २ यांनी लोकसेवक १ यांना फोन करून लाचेची रक्कम स्विकारल्याचे सांगितले असता लोकसेवक १ यांनी सदरबाबत अनुमोदन दिले त्यानुसार लोकसेवक १ व २ यांना ताब्यात घेऊन [illegible] १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला -

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अमलदाराचे नांव व हुद्दा: पोलीस निरीक्षक सुप्रिया गावडे. ला.प्र.वि.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................. Rank.................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................ (3) Transferred to P.S ......................................., District ............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

Supriya
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .. सुप्रिया गावडे
पदनाम Rank ...........
तपासिक अं. चा कोड. क्र. पोलीस निरीक्षक

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...........
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ............................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**